CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



## जनतेच्या पुण्याईवर अभिजीत पाटील विजयी होतील : खा. ओमराजे

### मानेगाव येथील सभेस प्रतिसाद

पंढरपूर : राजकारणात कामाची स्पर्धा महत्त्वाची असते. त्याच पद्धतीने अभिजीत पाटील यांनी विठ्ठल कारखाना शेवटच्या घटका मोजत असताना तो चांगल्या पद्धतीने सुरू करून शेतकऱ्यांना चांगला दर दिला. कोरोनाच्या महामारीत आर्थिक नुकसान करून नागरिकांचा जीव वाचवला हीच पुण्याई त्यांना निवडून देईल असा विश्वा, उबाठाचे खा. ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केला.




मानेगाव येथील सभेत बोलताना खा. ओमराजे निंबाळकर. सोबत खा. धैर्यशिल मोहिते, अभिजित पाटील.

माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ मानेगाव येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. खासदार ओमराजे निंबाळकर म्हणाले की, पंतप्रधानांनी अजितदादांना कारवाई करण्याचा इशारा दिला होता. मात्र त्यांनी सरकारला पाठिंबा दिल्यानंतर त्यांना थेट उपमुख्यमंत्री करून अर्थ खाते देण्यात आलं. ७० हजार कोटींचा घोटाळा करणाऱ्या अजितदादांना जर पंतप्रधान कारवाई करणार असे म्हणत असताना त्यांना उपमुख्यमंत्री करत असतील तर कोणावर विश्वास ठेवायचा. त्यांनी भाजपा सदबुद्धीने कारवाई करत आहे. पक्ष फोडीचे राजकारण केले. मराठा समाज शांततेत आंदोलन करत असताना लाठी चार्ज केला. आता ते म्हणतात बटेंगे तो कटेंगे याला माझे एकच उत्तर आहे. जुडेंगे तो जितेंगे. शेतकऱ्यांना जीएसटी लावला जातो. मात्र धन दांडग्यांना सूट दिली जाते, असा आरोप केला.

यावेळी अभिजीत पाटील म्हणाले की, अनेक वर्षांपासून रखडलेली विकास कामे पूर्ण करून मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी मतदान रूपी आशीर्वाद देऊन निवडून द्यावे.

### यांनी दिला अभिजित पाटलांना पाठिंबा

यावेळी माढा सकल मराठा समाज आणि जिल्हा दूध संघाचे संचालक व माढा नगरपंचायत नगरसेवक राजाभाऊ चवरे, कुर्मदास साखर कारखान्याचे माजी संचालक हिंदुराव आरे, अमरसिंह साठे व जामगाव विद्यमान सरपंच सोनाली हरिदास सरवदे, हरिदास नागनाथ सरवदे, बुद्रुकवाडीचे विद्यमान सरपंच पूजा गणेश माने यांनी अभिजीत पाटील यांना प्रवेश करून पाठिंबा दिला.

## माढ्याचा पूर्वभाग आ. शिंदेंनी विकासापासून वंचित ठेवला



### दादासाहेब साठे यांचा आरोप

मानेगाव/प्रतिनिधी

माढा शहरापासून मानेगाव जिल्हा परिषद गटाचा विकास जाणीवपूर्वक आमदार शिंदे यांनी केलेला नाही. या भागातून त्यांचे चिरंजीव यांनी जिल्हा परिषद गटाचे प्रतिनिधित्व केलेले आहेत.गेल्या ३० वर्षापासून माढा पूर्व भागातील विविध गावांना जोडणारे रस्ते शिक्षण, आरोग्य या समस्या आजही कायम आहेत. हा भाग त्यांनी जाणीवपूर्वक विकासापासून वंचित ठेवल्याचा आरोप दादासाहेब साठे यांनी केला.

माढा विधानसभा मतदारसंघाच्या राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या अधिकृत उमेदवार ॲड. मीनल साठे यांच्या प्रचारार्थ मानेगाव जिल्हा परिषद गटातील दारफळ या ठिकाणी प्रचार ते बोलत होते. साठे म्हणाले, विरोधी दोन्ही उमेदवारांकडून कारखान्याच्या उसाचा भाव शेतकऱ्यांना फुगवून सांगितला जातो. उसाच्या दराखाली शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. त्यांचा तालुक्यातील केवड व विठ्ठलराव शिंदे साखर कारखाना पिंपळनेर या दोन्ही कारखान्याच्या दरामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येते. विरोधी उमेदवार शेतकऱ्याच्या नावावरती बोगस कर्ज काढून कारखाना चालवीत आहेत. या उलट आम्ही सहकार चळवळ टिकवण्यासाठी स्वतःच्या प्रॉपर्टीवर कर्ज काढून शेतकऱ्यांची बिले देत आहोत. हा फरक शेतकऱ्यांनी लक्षात घ्यावा.

या कॉर्नर सभेसाठी भाजपाचे माढा शहराध्यक्ष मदन मुंगळे, नगरसेवक सुधीर लंकेश्वर, कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक विठ्ठल रामलिंग शिंदे, जामगाव चे मधुकर चव्हाण, हौसाजी पाटील, सुरेश अधटराव, रमेश चव्हाण गुरुजी, औदुंबर उबाळे, बाळासाहेब पाटील, योगेश अजूरे, पिंटू होनराव, अवधूत चव्हाण, नितीन महाडिक, चंद्रकांत बारबोले, सचिन उबाळे, अजित गोडगे, साहेबराव बारबोले, दिनकर चव्हाण, संजय पाटील उपस्थित होते.

### मुलाने घेतली आईच्या प्रचारात आघाडी....

ॲड. मीनल साठे यांची चिरंजीव ॲड. वेदांत साठे यांनी आपल्या आईच्या प्रचारासाठी त्यांनी युवकांची स्वतंत्र प्रचार यंत्रणा राबवून माढा शहर व माढा पूर्व भागातील प्रत्येक गावात जाऊन मतदारांची होम टू होम भेट घेऊन आपल्या आईला निवडून देण्याचे आवाहन केले. यांच्या या प्रचाराला युवकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.

## भूलथापांना बळी पडू नका; अमर पाटलांच्या मागे रहा

### रवी पाटील यांचे आवाहन



दक्षिण सोलापूर : शेतकऱ्यांना फसवणाऱ्या नेत्यांना गजाआड करण्यासाठी, मंद्रूप एम.आय.डीसीचा विषय मार्गी लावण्यासाठी कोणत्याही भुलथापाना बळी न पडता महाविकास आघाडीचे उमेदवार अमर पाटील यांना विजयी करा, असे आवाहन माजी आ. रवी पाटील यांनी केले.

लोकमंगलच्या शेतकरी सभासदांचे सात बारा घेऊन बनावट कर्ज प्रकरणे केली. कर्मचाऱ्यांच्या नावेही बनावट प्रकरणे केली. त्या प्रकरणाचे काय झाले? आपल्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी आ. देशमुख यांनी आपली आमदारकी आणि मंत्रिपद वापरले. त्यांनी मतदारसंघाच्या विकाससाठी काहीच केले नाही., असे ते म्हणाले. आमदारला आपण जागा दाखवून देऊ. ही निवडणूक लढवण्यासाठी एका अपक्ष उमेदवाराला कोटींची रसद पुरवण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे मते फोडून भ्रष्ट आणि नतद्रष्ट लोकप्रतिनिधीला मदत होणार आहे याची जाण ठेवा. आज मराठा असल्याचा प्रचार सुरु आहे. मग मराठा आरक्षण आंदोलन आणि जरांगे पाटील यांना विरोध का केला? असा सवालही पाटील यांनी केला.

## हद्दवाढ भागातील नागरिकांना हवे नवनिर्माण : कोगनुरे

### मनसेच्या पदयात्रेत पथनाट्यातून जनजागृती

दक्षिण सोलापूर : सोलापूर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांच्या प्रचारार्थ हद्दवाढ भागात बुधवारी सायंकाळी निघालेल्या पदयात्रेला मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी सादर करण्यात आलेल्या पथनाट्यातून विद्यमान सरकारच्या कारभारावर टीका करून महादेव कोगनुरे यांना प्रचंड मतांनी विजयी करा असा संदेश देण्यात आला.



महादेव कोगनुरे म्हणाले की, हद्दवाढ भागाच्या समस्या अनेक वर्षांपासून जैसे थे. हा भाग महापालिके जाऊन काय उपयोग झाला असा सवाल येथील नागरिक विचारत आहेत. कोणत्याही सुविधा नसताना कर मात्र भरावा लागत आहे. या भागाचा सर्वांगिण विकास करायचा असेल तर नवनिर्माणाची गरज आहे. यावेळी ताई चौक, दीक्षित नगर, मल्लिकार्जुन नगर, स्वागत नगर, केंगनाळकर शाळा, हुच्चेश्वर मठ, पारसी मैदान, म्हेत्रे वस्ती, शिवगंगा चौक, विष्णूनगर, शोभादेवी नगर, भीमाशंकर नगर, चंद्रकला नगर,शशीकला नगर, ललिता गट, शांतिनगर झोपडपट्टी १ व २, देसाईनगर, राजीव नगर, बसवेश्वर चौक, शांतीनगर चौक, अरुणोदय नगर, बसवरोड मठ या भागात पदयात्रा उत्साहात झाली. हद्दवाढ भागात पाण्यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. आतापर्यंतच्या लोकप्रतिनिधींनी याकडे दुर्लक्ष केले आहे. आता महादेव कोगनुरे हा प्रश्न तातडीने सोडवतील असा विश्वास असल्याने त्यांच्या पदयात्रांना महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.



सोलापूर : प्रभाग १ मध्ये आयोजित पदयात्रेत खा.प्रणिती शिंदे आणि महेश कोठे.

## जयंत पाटील, खा. लंके यांच्या आज सभा

### अनिल सावंत यांचा प्रचार







पंढरपूर : पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महा विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आमदार जयंत पाटील यांची १५ नोव्हेंबर रोजी जाहीर सभा पंढरपूर येथील छत्रपती शिवाजी चौकामध्ये सकाळी ११ वाजता होणार आहे. १५ नोव्हेंबर रोजी मंगळवेढा येथे खासदार निलेश लंके यांची मंगळवेढा शहरातील मारुती पटांगणामध्ये दुपारी २ वाजता जाहीर प्रचार सभा होणार आहे. मतदारांनी कोणतीही संभ्रमात बाळगण्याचे कारण नाही कारण पंढरपूर मंगळवेढ्याची जागा आमची आहे. यासाठीच प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील आणि खासदार निलेश लंके यांच्या सभा होणार आहेत. शरद पवारही या मतदारसंघात सभा घेणार नाहीत, ही अफवा आहे. मतदारांनी यावर विश्वास ठेवू नये., राष्ट्रवादी पंढरपूर मंगळवेढाची जागा पूर्ण तकतीनिशी लढते आहे.खरंतर भगीरथ भालके हे उमेदवार काँग्रेसचेच आहेत का, हे काँग्रेसने तपासणे आवश्यक आहे. सगळ्या पक्षातून फिरून आलेल्या उमेदवारांना निवडणुकीमध्ये लोकचं योग्य उत्तर देतील, असे पवार गटाचे उमेदवार अनिल सावंत म्हणाले.

## आघाडीचा प्रचार पाहून भाजपला धडकी : खा.शिंदे

### महेश कोठेंसाठी शहर उत्तरमध्ये पदयात्रा

सोलापूर/प्रतिनिधी

महाविकास आघाडीचे उमेदवार खूप चांगल्या प्रकारे प्रचार करत आहेत. त्यामुळे भाजपच्या उमेदवारांना धडकी भरली असून यंदा महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होतील, असा विश्वास खासदार प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केला.

महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार महेश कोठे याना शहर उत्तर मतदार संघात खा.प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पदयात्रा काढण्यात आली, त्यात खा. शिंदे बोलत होत्या. होम टू होम, पदयात्रा कॉर्नर बैठका मधून महेश कोठे हे मतदारांच्या घरोघरी जात आहेत.

दरम्यान गुरुवारी सकाळी प्रभाग क्रमांक एक मध्ये महेश कोठे यांच्या पदयात्रेला नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

या पदयात्रेत महेश कोठे यांच्यासोबत खासदार प्रणिती शिंदे सहभागी झाल्या होत्या. ठिकठिकाणी महेश कोठे यांचे औक्षण करून आणि पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले जे लोक आजपर्यंत सांगत होते आमची व्होट बँक आहे, त्या मारवाडी समाजाचा देखील आज मला आशीर्वाद मिळाल्याचे महेश कोठे म्हणाले.

यंदा च्या वर्षी आपल्याला बदल घडवण्याचीसंधी मिळाली असून या संधीच सोन करू, असे या भागातील नागरिक म्हणाले. यावेळी महाआघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सिध्देश्वर बँकेतर्फे आज मतदान जनजागृती रॅली

दक्षिण सोलापूर : सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त बँकेच्या वतीने शुक्रवार दि. १५ नोव्हेंबर रोजी मतदान जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहीती बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभिरे यांनी दिली. सकाळी ९.३० ते दुपारी १.०० दरम्यान बँकेच्या मंगळवार पेठ येथील मुख्य कार्यालयातील कै. वि. गु. शिवदारे यांच्या पुतळ्यापासून बँकेचे मार्गदर्शक राजशेखर शिवदारे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार असून बोरामणी तालीम, तुळजापूर वेस, मराठा वस्ती, बुधले गल्ली, लक्ष्मीनारायण मंदीर, चाटी गल्ली,ई भडंगे गल्ली, टिळक चौक, होटगी मठ या मार्गाने निघून मल्लीकार्जून मंदीर येथे रॅली समाप्त करण्यात येत आहे अशी माहिती व्हा. चेअरमन सौ. सुचेता थोबडे यांनी दिली. या रॅलीत मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे या आशयाची पथनाट्येही सादर केली जाणार आहेत. या रॅली मध्दे बँकेचे सर्व कर्मचारी उपस्थित राहणार असून या राष्ट्रीय कर्तव्यासाठी सर्वांनी सहभाग नोंदवावा, असेही आवाहन करण्यात आले.

## हत्तुरे वस्ती येथे धर्मराज काडादी यांच्या पदयात्रेस प्रतिसाद



दक्षिण सोलापूर : सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार तथा सिध्देश्वर परिवाराचे प्रमुख धर्मराज काडादी यांना निवडून देण्याचा संकल्प होटगी रोड आणि परिसरातील मतदारांनी व्यक्त केला.

गुरूवारी, सकाळी काडादी यांच्या प्रचारासाठी निघालेल्या पदयात्रेत सर्व पक्षीय मतदारांचा मोठा सहभाग होता. मतदारांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टीकरून काडादी यांचे स्वागत केले. गेल्या दहा वर्षापासून सत्तेवर असलेल्या उमेदवाराकडून सातत्याने होणाऱ्या अन्यायातून सुटका होण्यासाठी काडादी यांचा विजय आवश्यक असल्याचे नागरिकांनी सांगितले. बसवेश्वर नगर येथून सुरू झालेली पदयात्रा महाळींगराया नगर, रेवणसिध्देश्वर नगर, शंकर नगर, कुमठा रोड, टिकेकर वाडी, हरळय्या नगर, राहुल वस्ती, कामरान चौक, हत्तुरे वस्तीतील ओम नम शिवाय नगर, स्वामी विवेकानंद नगर,हत्तुरे नगर, मल्लिकार्जुन नगर या भागात झाली. अण्णा गणपती मंडळातर्फे पुष्पवृष्टी करून काडादी यांचे स्वागत करण्यात आले. रेवणसिध्देश्वर नगर येथील जगदंबा भवानी मातेचे काडादी यांनी दर्शन घेतले. शिवगौरी माता आणि महादेव मंदिरातही काडादी यांनी श्रींचे दर्शन घेतले.

या पदयात्रेत श्री सिध्देश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते, ज्येष्ठ नेते अप्पासाहेब हत्तुरे, ॲड.संजय हत्तुरे, अनिल बिराजदार, बसवराज शास्त्री हिरेमठ, शैलेश शेवगार, चंद्रकांत नवत्रे, संजयसिंह बायस, चिदानंद हिरेमठ, नागेश पाटील होटगीकर, शरणप्पा शेवगार, महादेव सालुटगी, जम्मा परिवार, ॲड.संजय हत्तुरे मित्र मंडळाचे कार्यकर्ते, सिध्देश्वर परिवारातील सदस्य आणि सोलापूर दक्षिण मतदारसंघातील सर्वपक्षीय कार्यकर्तेही या पदयात्रेत सहभागी झाले होते. पदयात्रेला मिळालेला उत्साह कौतुकास्पद आहे. सर्वांनी प्रयत्न करून काडादी यांना विजयी करावे, असे अप्पासाहेब हत्तुरे यांनी केले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मी तुला चॉकलेट दिलंय ना! मग फक्त माझ्याशीच बोलायचं!

कल्याण
456-57-377

मुंबई
880-62-129

## मोनिका कोठे, किसन जाधव यांचा होम टू होम प्रचार

सोलापूर/प्रतिनिधी

शहर मध्य विधानसभा निवडणुकीतील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (ए) महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे यांच्या प्रचारार्थ मोनिका कोठे यांच्यासह माजी नगरसेवक किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांच्या प्रचाराचा झंझावात पाहायला मिळत आहे.



सोलापूर : देवेंद्र कोठे यांच्यासाठी मोनिका कोठे, किसन जाधव होम टू होम प्रचार करत आहेत.

प्रभाग क्रमांक २२ मधील रामवाडी, सेटलमेंट, पटवर्धन चाळ, लिमयेवाडी परिसरात देवेंद्र कोठे यांच्या प्रचारासाठी होम टू होम प्रचार अभियान राबविण्यात आले.

माजी नगरसेवक किसन जाधव, नागेश गायकवाड, चंद्रकांत गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत हे अभियान झाले. यावेळी आकाश पडवळकर, सूर्यकांत गायकवाड, चेतन गायकवाड, नागेश गायकवाड, शिरीष गायकवाड, रुक्मिणी जाधव, शोभा गायकवाड, सुनीता बिराजदार, भरता आसवदे, दीपक गायकवाड, श्रीनिवास गायकवाड, सुरेश भंडारे, विनीत गायकवाड, रोहन जाधव, कुमार कांती, नवनाथ साळुंखे, बाबुराव संगेपांग, अजित मित्रगोत्री, सत्यम जाधव, जयश्री गायकवाड, सरोजिनी गायकवाड, मीना गायकवाड आदी उपस्थित होते.



दक्षिण सोलापूर : अपक्ष उमेदवार सोमनाथ वैद्य यांनी घरोघरी जाऊन प्रचार केला. दक्षिण मधील भंडारकवठे, वडापूर, कुसूर, निंबर्गी भागात भेटी देत निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.